Rotary

BE THE INSPIRATION

# रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद

Club No. 15487 I Dist. 3132

# ॥ सन्मानपत्र ॥

## प्रा. सुरेश गायकवाड

यांचा शिक्षक दिनानिमित्ताने "गुरु गौरव" करतांना अतिशय आनंद होत आहे. गुरूबद्दल सर्वत्र आदरभाव व्यक्त केला जातो. भारतीय संस्कृतीत तर गुरूचे अनन्य साधारण महत्व आहे. या जाणीवेतून निर्माण होणारी भावना म्हणजेच

"शिक्षक दिन"

आपण विद्यादानाचे जे सर्वश्रेष्ठ कार्य करीत आहात, त्यातून प्रत्येक विद्यार्थ्यांना सत्प्रवृत्ती, समर्पितभाव, कष्टाळूपणा व न्यायप्रियता हे गुण तसेच विजयाचा आनंद आणि पराभवाचे दुःख पचविण्याची ताकत निर्माण होत असते. ज्ञानात दडलेल्या सामर्थ्याचा परिचय आपण त्यास करून देत असता. आपल्या या प्रयत्नांतून नविन आचार विचारांचा, सज्जन, समर्थ व ध्येयनिष्ठ समाज निर्माण होण्यास मदत होत असते.

आजपर्यंत आपण करीत आलेल्या या श्रेष्ठ कार्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करून आपणास हार्दिक शुभेच्छांसहित हे सन्मानपत्र प्रदान करीत आहोत.

दि. १२ सप्टेंबर २०१८

| रो. अमित कोरडे | रो. सरिता लोणीकर | रो. मिलींद सेवलीकर |
|---|---|---|
| अध्यक्ष | प्रकल्प प्रमुख | सचिव |